कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव
गायकवाड पुरस्कार - सन २००२-२००३

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक** :- दागापु- २००४/प्र.क्र५९/मावक-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ ऑगस्ट्र ,२००४

प्रस्तावना : कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांनी समाजातील भूमिहीन, दलित घटकासाठी केलेल्या कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन दि. १५ ऑक्टोबर, २००१ ते १५ ऑक्टोबर, २००२ या कालावधीत त्यांची जन्मशताब्दी वर्ष साजरे केले. या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून भूमिहीन, दलित क्षेत्रात उल्लेखनिय व निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस व एका सामाजिक संस्थेस दरवर्षी राजस्तरीय पुरस्कार देण्याचे ठरविले. या पुरस्काराच्या माध्यमातून अशा सामाजिक संस्था व व्यक्ती यांना, त्यांनी चालविलेले कार्य अधिक जोमाने व निस्वार्थपणे करण्यास स्फूर्ती मिळेल. पुरस्काराचे स्वरुप व्यक्तीस एक सन्मानपत्र, एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.२१,००१/- अशाच प्रकारे संस्थेस एक सन्मानपत्र, एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.३०,००१/- असे ठरविण्यात आले.

**शासन निर्णय** :- पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार या योजनेंतर्गत सन २००२-२००३ या वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या व्यक्ती व संस्थेची निवड करण्यात येत आहे.

१) व्यक्ती : श्री. देवराव विठ्ठल फडतरे, ३६७, गौतम नगर, गरीबी हटाव झोपडपट्टी, विजापूर नाका, विजापूर रोड,सोलापूर-४.

२) संस्था : पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई.

२. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्थाचे प्रतिनिधी यांना पुरस्कार वितरण समारंभाच्या कालावधीत तीन दिवसाकरीता शासकीय पाहुणे म्हणून समजण्यात येईल.

३. **"पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार"**करिता निवड केलेल्या व्यक्ती आणि संस्थेचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्र (सर्वसाधारण भाग) मध्ये प्रसिध्द करण्यात यावे.

४. संचालक, समाजकल्याण यांना सन २००४-०५ या वर्षाकरिता २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०३-मागासवर्गीयांचे कल्याण-८०० इतर खर्च-८०, सर्वसाधारण-१०२, स्वयंसेवी संस्थाना मदत (०२) (०३) स्वयंसेवी संस्थांना अनुदाने.कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड जन्मशताब्दी आणि बक्षीस वितरण (२२२५ ३१२ ६) ४१-सहाय्यक अनुदान यासाठी मंजूर केलेल्या लेखाशिर्षा मधून याबाबतचा खर्च करण्यास संचालक, समाजकल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या समारंभाचे आयोजन दिनांक १० ऑगस्ट,२००४ रोजी महाड येथे करावयाचे प्रस्तावित आहे. याबाबत संचालक, समाजकल्याण,पुणे यांचे मार्फत फॅक्स / पत्राने / दूरध्वनीवरुन स्वतंत्रपणे कळविण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ.रा.धोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय आयुक्त,कोकण भवन / पुणे
जिल्हाधिकारी, सोलापूर/मुंबई
विभागीय समाजकल्याण अधिकारी,मुंबई/पुणे
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,सोलापूर/मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २, मुंबई-नागपूर (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महासंचालनालय, मुंबई.

त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात आलेल्या पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थेची माहिती प्रसिध्दीस द्यावी.

निवड नस्ती - मावक-१.

# अर्जाचा नमुना (व्यक्तीसाठी)

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

पास पोर्ट फोटो
(अलीकडील)

**पुरस्काराचे नांव:-**

**वर्ष:-**

**जिल्ह्याचे नांव:-**

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तींचे संपूर्ण नांव | |
| २ | संपर्क (मोबाईल/दुरध्वनी ) क्रमांक | |
| ३ | व्यक्तीचा पत्ता<br>(संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता ) | |
| ४ | जन्मतारीख<br>(शाळा सोडल्याचा दाखला/ आधार कार्ड/ दहावी बोर्डाचे प्रमाणपत्र/ जन्म दाखला) | |
| ५ | वय :- | |
| ६ | शिक्षण (अंतिम शैक्षणिक अर्हता नमुद करावी) | |
| ७ | जात:-<br>(मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखल्याची प्रत सोबत जोडावी) | |
| ८ | नोकरी/ व्यवसाय | |

| | | |
|---|---|---|
| ९ | जिल्हा दक्षता समिती यांचे शिफारस पत्र | |
| १० | अर्जदाराचे चारित्र्य प्रमाणपत्र/ विना दुराचार प्रमाणपत्र (पोलीस विभागाचा दाखला) | |
| ११ | शासकीय /अशासकीय पदावर नियुक्त आहे काय, (असल्यास पदाचे व कार्यालयाचे नाव) | |
| १२ | अनु.जाती/जमाती/ भटक्या विमुक्त जाती/मनोदुर्बल/ अपंग/कुष्ठरोगी इत्यादी कार्यक्षेत्रात महत्वाचे कार्य केल्याचा तपशील ( माहीती सोबत जोडावी ) | |
| १३ | भूमीहीन शेत मजुर व कामगारांसाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कारासाठी) | |
| १४ | मातंग समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्टया कल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारासाठी) (फक्त मातंग समाजातील समाजसेवक, कलावंत व साहित्यिक यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येतो.) | |
| १५ | समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाज व दलित समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्यायनिर्मुलन, अधंश्रध्दा निर्मुलन, जन जागरण इत्यादी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (संत रविदास पुरस्कारासाठी) | |
| १६ | सामाजिक सेवेचा कालावधी | |
| १७ | व्यक्तीचे साहित्य, कला, अंधश्रध्दा, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान. | |

| | | |
|---|---|---|
| १८ | पत्नीचे नाव व वय | |
| १९ | यापुर्वी इतर पुरस्कार/बहुमान मिळाला आहे काय, पुरस्काराचे नांव (कोणत्या क्षेत्रात) | |
| २० | व्यक्ती कार्यकर्ता यांनी त्यांचे समाज सेवेच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील (कागदोपत्री पुरावे, कात्रणे, फोटोग्राफ, लेख, पुरस्काराचे फोटोग्राफ, प्रशस्तीपत्रे इत्यादी,) माहिती सोबत जोडावी. | |
| २१ | शिफारस करणाऱ्या नामांकीत व्यक्तिचे नाव पद | |

टिप : प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्र अर्ज करावा, एका वर्षात एकाच पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

दिनांक : / /२०२२

(अर्जदार व्यक्तीचे स्वाक्षरी व नाव )

**कार्यालयीन उपयोगासाठी:-**

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/ सहायक आयुक्त, समाजकल्याण अभिप्राय / शिफारस------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग

सहायक आयुक्त, समाज कल्याण